सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.३.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : अक्षता अशोक शिवरकर
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी,
राहणार : फुरसुंगी पुणे.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती कस्तुरे :-</u>**

१. फिर्यादी माझी आई आहे. सन २०२० व त्यापुर्वी मी माझ्या आई-वडिलांसोबत दयानंद गार्डन सोसायटी वानवडी पुणे येथे राहत होते.माझे सन २०१८ मध्ये लग्न झाले व लग्नानंतर मी माझ्या आईकडे येउन जाउन असायचे.मी आरोपी क्र. १ व २ यांना ओळखते. आरोपी क्र.१ हे दयानंद गार्डन सोसायटीचे चेअरमन आहेते व आरोपी क्र.२ हे सदर सोसायटीचे सेक्रेटरी आहेत.अंदाजे सन २०१३-२०१४ पासुन आरोपी क्र.१ व २ हे सदर सोसायटीचे चेअरमन व सेक्रेटरी आहेत. अशोक शिवरकर माझे वडील आहेत.

सन २०१४ साली मी कॉलेजला होते.व त्यावेळी सोसायटीमध्ये कोजागिरीचा कार्यक्रम होता.त्यावेळेस आरोपी क्र.२ सोसायटीचे सेक्रेटरी होते.सोसायटीच्या गार्डनमध्ये कोजागिरीचा कार्यक्रम होता व मी तसेच माझी आई गार्डनमध्ये बसलो होतो.त्यावेळी आरोपी क्र.२ गार्डनमध्ये आले व माझ्या आईला म्हणाले तुम्ही छान दिसता मला फ्रेंडशिप करायची आहे.त्यानंतर आम्ही तेथुन उठुन गेलो. व घरी जाऊन माझ्या वडिलांना सांगितले.माझ्या वडिलांनी आरोपी क्र.२ ला फोन केला.व ते असे का बोलले याबाबत विचारणा केली.त्यानंतर फोन कट केला.

माझी आई एकवेळेस दयानंद गार्डनमध्ये संध्याकाळी वॉकिंग करत होती.सदर घटनेची नेमकी तारिख मला आठवत नाही.त्यावेळेस आरोपी क्र.१ तेथे होते व ते माझ्या आइला म्हणाले देखेंगे और दिखायेंगे.त्यावेळेस मी पार्किंग मध्ये होते. मी व माझी आई घरात गेलो. माझ्या आईला खुप राग आला होता व माझ्या आईला तसे बोलल्याचे आवडले नाही. आम्ही माझ्या वडिलांना त्याबाबत सांगितले.माझ्या वडिलांनी आरोपी क्र. १ ला फोन केला व त्यांच्यासोबत बोलले.

त्यानंतर कोविडची सुरुवात झाली. मी व माझा भाऊ आय.टी मध्ये नोकरी करतो व आम्हांला इंटरनेटची आवश्यकता होती. आम्ही जिओ कंपनीचे कनेक्शन घ्यायचे ठरविले.जिओ कंपनीचे लोक व्यवस्थित मास्क लाऊन व सॅनिटायझर लाऊन आले होते. आमच्या टेरेस ला लॉक असते व कनेक्शन घेण्यासाठी आम्ही वॉचमेन कडे टेरेसची चावी मागितली. परंतु वॉचमेनने चावी दिली नाही व चेअरमन से बात करो असे

म्हणाला.माझ्या आईने आरोपी क्र.१ ला २ ते ३ वेळेस फोन लावला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे माझ्या आईने आरोपी क्र.२ ला फोन लावला. त्यावेळी आरोपी क्र.२ ने फोन उचलला व सांगितले की कोविड चा रुल आहे व बाहेरचे कोणी येऊ शकत नाही.त्यावर माझी आई त्यांना म्हणाली की आदल्या दिवशी सगळयांनी कनेक्शन घेतले आहे,तुम्ही मला का अडवता आहात, माझी दोन्ही मुले आय.टी मध्ये आहेत व त्यांना वर्क फ्रॉम होम असते. व तुम्ही असे करु नका आम्हांला कनेक्शन दया. त्यांनी टेरेसचे कुलुप उघडले व कनेक्शनचे काम झाले.

सोसायटी मध्ये नाना नावाचा वॉचमन आहे. व आरोपी त्याच्याकडे सतत माझी आई कधी येते व जाते याची विचारणा करत होते.एकवेळेस माझी आई मेंटेनंस चा चेक देण्यासाठी सोसायटी मध्ये गेली असता अकांउटंट ने चेक चेअरमनच्या घरी नेऊण दया म्हणुन सांगितले. त्यावर माझ्या आईने सांगितले की मी कोणाच्या घरी जाऊन चेक देणार नाही व डॉपबॉक्स मध्ये टाकते.आरोपींनी सोसायटीच्या माय गेट अॅप वर व नोटिस बोर्डवर माझ्या आईने कोरोनाचा रुल मोडल्याचे लिहीले.आरोपींचे माझ्या आईकडे सतत लक्ष असते व येता जाता काहीतरी बोलत असतात.याबाबत माझ्या आईने तक्रार दिल्याचे माहित आहे. मी पोलिस ठाण्यात गेले होते.मी पोलिसांना माहिती दिली होती व त्यांनी माझे तपास टिपण नोंदविले.मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकते. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. निंबाळकर यांचेमार्फत -</u>**

३. मी न्यायालयात साक्ष देण्यासाठी आज पहिल्यांदा आली आहे. हे म्हणणे खरे नाही की साक्ष बाबत मी आईसोबत चर्चा केली होती. दिनांक ०३-०१-२०२६ रोजी मी न्यायालयात आले होते अगर कसे ते मला आठवत नाही.दिनांक ०३-०१-२०२६ रोजी मी पुण्यात होते अगर कसे ते मला आठवत नाही. माझ्या सासुबाई आजारी असतात व त्या सोलापुर येथे असतात.दिनांक ०३-०१-२०२६ रोजी माझे सासरे वारले होते अगर कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०३-०१-२०२६ रोजी मी खोटे सांगुन न्यायालयातुन तारीख वाढवुन घेतली होती.सन २०१४ साली माझी आई सोसायटीच्या कमिटीमध्ये होती अगर कसे ते मला सांगता येणार नाही.मी सोसायटी स्थापन झाल्यापासुन तेथे राहत आहे.सन २००३ ते २०१९ या कालावधीमध्ये सोसायटी मध्ये चेअरमन व सेक्रेटरी कोण होते याची मला माहिती आहे.साक्षीदार स्वताहुन सांगते की मी वैयक्तिक त्याबात सोसायटी मध्ये जाऊन माहिती घेतली आहे.हे म्हणणे खरे आहे की सोसायटीमध्ये दर ५ वर्षाला मतदान असते व कमिटी बदलत असते.माझी आई कमिटी मध्ये असताना सोसायटीमध्ये निता धुरकर या चेअरमन व

फर्नांडिस सेक्रेटरी होते अगर कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की सन २०१४ मध्ये सोसायटीमध्ये कोणते पद कोणाकडे होते हे मला आठवत नाही.साक्षीदार स्वताहुन सांगते की साधारण त्यावेळी आरोपी क्र.१ व २ हेच पदाधिकारी होते. हे म्हणणे खरे आहे की माझी कमिटीमध्ये असल्याचा कालावधी सन २०११ ते २०१६ होता .साक्षीदार पुन्हा सांगते की त्या कालावधीबाबत मला आठवत नाही.हे म्हणणे खरे नाही की माझी आई कोणत्या कालावधीमध्ये कमिटीमध्ये होती हे आठवत नसल्यामुळे आरोपी क्र.१ व २ हे चेअरमन व सेक्रेटरी असल्याचे देखील मला आठवत नाही.माझ्या आईचे सोसायटी सोबत कोणते वैयक्तिक वाद आहेत हे मला माहित नाही.सन २०१४ साली मी शिक्षण घेत होते.मी त्यावेळी सोसायटीच्या कार्यक्रमांना जात असे.हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महिला उपाध्क्ष हे पद होते व तो कालावधी सन २०१४ च्या आसपासचा होता.हे म्हणणे खरे आहे की सोसायटीचे वाद व मेंटेनंस या बाबत माझी आई पहायची.साक्षीदार सांगते की वडील देखील कधी कधी पहायचे. सोसायटी सोबतचे वाद आइसोबत माझे वडील देखील पहायचे.हे म्हणणे खरे नाही की सोसायटीच्या वादामध्ये मी कधी नसायचे. साक्षीदार स्वताहुन सांगते की मी एकवेळेस तक्रार देण्यासाठी गेले होते.ती तक्रार पोलिस ठाण्यात दिली होती.हे म्हणणे खरे आहे की ती तक्रार सोसायटीने माझ्या आईला ज्या नोटिस पाठविल्या व त्यामुळे झालेल्या त्रासाबाबत होती. हे म्हणणे खरे आहे की त्याच तक्रारीबाबत मी आज जबाब देत आहे.हे म्हणणे खरे आहे की लग्नानंतर मी सासरी नांदण्यासाठी गेले होते. माझे सासर सोलापुर येथे आहे परंतु हडपसर पुणे येथे राहत आहे.मार्च २०२० ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव होता.त्यावेळेस लॉकडाऊन असल्यामुळे एका ठिकानाहुन दुसरया ठिकाणी जाण्यासाठी पास काढावे लागत होते. साक्षीदार स्वताहुन सांगते की दि २८-०९-२०२० रोजी मी माझ्या आईकडेच रहाण्यासाठी होते. हे म्हणणे खरे नाही की माझे समक्ष कोणतीही घटना दि.२८-०९-२०२० रोजी घडली नाही.जिओ कनेक्शन बसविण्यासाठी दि.१३.०६.२०२० रोजी कामगार आले होते अगर कसे ते मला आठवत नाही.त्यावेळी गेटवर वॉचमेन होता परंतु त्याचे नाव अमतराज होते अगर कसे मला आठवत नाही.साक्षीदार सांगते की बहुतेक त्याचे नाव अमतराज असेल. हे म्हणणे खरे आहे की तो वॉचमेन टेरेसची चावी देत नसल्यामुळे वाद झाले होते.वॉचमेनने आईविरुदध सोसायटीकडे तक्रार दिली होती अगर कसे याची मला माहिती नाही. माझ्या आईला सोसायटी ने नोटिस पाठविल्या होत्या अगर कसे याची मला माहिती नाही. मी दि.११.१०.२०२० रोजी पोलिसांकडे जबाब दिला होता व तो जबाब देण्यासाठी मी आईसोबत गेले होते. हे म्हणणे खरे नाही की काय स्वरुपाचा जबाब दयायचा ते मला आईने सांगितले होते. दि. ०२.१०.२०२० या दिवशी माझ्या आईने तक्रार दिली होती अगर कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात मी ज्या घटनांचा उल्लेख केला आहे त्या माझ्या समक्ष घडल्या नव्हत्या.हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्या आईसोबत कधीही गैरवर्तवणुक केलेली नाही.हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्या आईसोबत कधाही गैरवर्तवणुक केली

नसल्यामुळे मला तिने सांगितले नव्हते.हे म्हणणे खरे नाही की माझ्या आईने दाखल केलेल्या खोटया फिर्यादीला मदत व्हावी म्हणुन मी खोटी साक्ष देत आहे.हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.मी पोलिसांकडे तपास टिप्पण नोंदविताना सन २०१४ साली मी कॉलेजला होते.व त्यावेळी सोसायटीमध्ये कोजागिरीचा कार्यक्रम होता.त्यावेळेस आरोपी क्र.२ सोसायटीचे सेक्रेटरी होते.सोसायटीच्या गार्डनमध्ये कोजागिरीचा कार्यक्रम होता व मी तसेच माझी आई गार्डनमध्ये बसलो होतो,तसेच त्यावेळेस आरोपी क्र.१ तेथे होते व ते माझ्या आइला म्हणाले देखेंगे और दिखायेंगे.त्यावेळेस मी पार्किंग मध्ये होते. मी व माझी आई घरात गेलो. माझ्या आईला खुप राग आला होता व माझ्या आईला तसे बोलल्याचे आवडले नाही. आम्ही माझ्या वडिलांना त्याबाबत सांगितले.माझ्या वडिलांनी आरोपी क्र. १ ला फोन केला व त्यांच्यासोबत बोलले, तसेच त्यानंतर कोविडची सुरुवात झाली. मी व माझा भाऊ आय.टी मध्ये नोकरी करतो व आम्हांला इंटरनेटची आवश्यकता होती. आम्ही जिओ कंपनीचे कनेक्शन घ्यायचे ठरविले.जिओ कंपनीचे लोक व्यवस्थित मास्क लाऊन व सॅनिटायझर लाऊन आले होते. आमच्या टेरेस ला लॉक असते व कनेक्शन घेण्यासाठी आम्ही वॉचमेन कडे टेरेसची चावी मागितली. परंतु वॉचमेनने चावी दिली नाही व चेअरमन से बात करो असे म्हणाला.माझ्या आईने आरोपी क्र.१ ला २ ते ३ वेळेस फोन लावला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे माझ्या आईने आरोपी क्र.२ ला फोन लावला. त्यावेळी आरोपी क्र.२ ने फोन उचलला व सांगितले की कोविड चा रुल आहे व बाहेरचे कोणी येऊ शकत नाही.त्यावर माझी आई त्यांना म्हणाली की आदल्या दिवशी सगळयांनी कनेक्शन घेतले आहे,तुम्ही मला का अडवता आहात, माझी दोन्ही मुले आय.टी मध्ये आहेत व त्यांना वर्क फ्रॉम होम असते. व तुम्ही असे करु नका आम्हांला कनेक्शन दया. त्यांनी टेरेसचे कुलुप उघडले व कनेक्शनचे काम झाले.सोसायटी मध्ये नाना नावाचा वॉचमन आहे. व आरोपी त्याच्याकडे सतत माझी आई कधी येते व जाते याची विचारणा करत होते.एकवेळेस माझी आई मेंटेनंस चा चेक देण्यासाठी सोसायटी मध्ये गेली असता अकांउटंट ने चेक चेअरमनच्या घरी नेऊण दया म्हणुन सांगितले. त्यावर माझ्या आईने सांगितले की मी कोणाच्या घरी जाऊन चेक देणार नाही व डॉपबॉक्स मध्ये टाकते.आरोपींनी सोसायटीच्या माय गेट अॅप वर व नोटिस बोर्डवर माझ्या आईने कोरोनाचा रुल मोडल्याचे लिहीले.आरोपींचे माझ्या आईकडे सतत लक्ष असते व येता जाता काहीतरी बोलत असतात.याबाबत माझ्या आईने तक्रार दिल्याचे माहित आहे. मी पोलिस ठाण्यात गेले होते.मी पोलिसांना माहिती दिली होती व त्यांनी माझे तपास टिपण नोंदविले,हा सर्व मजकुर सांगितला होता. परंतु तसा मजकुर माझ्या तपास टिप्पणात का नमुन नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

 **आर.सी.सी. १०३८/२०२०**
**निशाणी क्र – २२.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिलांच्या तोंडी विनंती वरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

समक्ष,

सहि/-
(अ.अ.कुलकर्णी)
३रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : ०२/०५/२०२६.